# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी क्र – ०२२ २६५४ ३०३५ / २६५३ ०२८३
ईमेल - cap.exam@mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई– ४०० ०९८.

क्र. परीक्षा/कें.मु.कें./3323 /२०२०

दिनांक : 08 जानेवारी २०२०

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नीत व विद्यापीठ संचालित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख, दूर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि: संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे असे सुचित करण्यात येते की, मुंबई विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने विद्यापीठामार्फत घेण्यात येणा–या सर्व परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांच्या मुल्यांकन संगणकाधारित OSM (On Screen Marking) प्रणालीमार्फत करण्याचा निर्णय घेऊन सदर निर्णयाच्या अनुषंगाने प्रथम सत्र २०१७ पासून ते द्वितीय सत्र २०१९ पर्यंतच्या परीक्षांच्या उत्तरपुस्तिकांच्या मुल्यांकनाचे काम करण्यात आले असून त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल घोषित करण्यात येत आहे.

संगणकाधारित OSM (On Screen Marking) प्रणालीबाबत शिक्षकांकडून वेळोवेळी मिळालेल्या सूचना आणि OSM (On Screen Marking) मध्ये सुसुत्रता आणण्यासाठी विद्यापीठाने सतत OSM (On Screen Marking) च्या सॉफ्टवेअर (Software) मध्ये बदल केले आहेत. त्यानुसार आता ही सर्विस प्रोवायडरच्या माध्यमातून काही बदल केले असून सदर बदल एप्रिल २०२० पासून लागू करण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने सर्व महाविद्यालयातील प्राचार्य/तांत्रिक समन्वयक (IT- Co-ordinator)/शिक्षक यांना विनंती करण्यात येते की, महाविद्यालयातील OSM साठी वापण्यात येणारे संगणक **http://uom.examtrac.in** या संकेतस्थळावर केलेल्या सुचनेप्रमाणे अद्यावत करावे व संकेतस्थळावर शिक्षकांना सरावासाठी असलेल्या Dummy Scripts for Practise याचा वापर करून एप्रिल २०२० पूर्वी सराव करावा. प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी हि बाब संबंधितांच्या निदर्शनास आणावी.

डॉ. विनोद पाटील.
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

Kamal pc/D/All draft & letters Marthi letter

Scanned by CamScanner